गोपनीय

दक्षतारोध पार करण्यास अनुज्ञा देणे

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक एसआरव्ही. १०८४/(के. नं. ३५/८४)/बारा
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जुलै १९८४

संदर्भ.—(१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही. १०७२/डी, दिनांक १२ एप्रिल १९७२.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही. १०७५/१०, दिनांक २८ ऑक्टोबर १९७६.

### परिपत्रक

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही. १०७५/१०, दिनांक २८ ऑक्टोबर १९७६ अन्वये वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांना दक्षतारोध पार करण्यास अनुज्ञा देण्याचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत. वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांना अशी अनुज्ञा देण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना असतात. तथापि, दक्षतारोध पार करण्याच्या प्रकरणात अंतिम निर्णय घेणे व अनुज्ञा देण्याबाबतचे आदेश निर्गमित करणे यात अनेक वेळा विलंब होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत.

२. विलंब होण्याच्या कारणांपैकी एक कारण असे नमूद करण्यात येते की, ज्या अधिकाऱ्यांची प्रकरणे त्यांची विहित वयोमर्यादेनंतर सेवेत राहण्याची पात्रता ठरविण्यासाठी विशेष पुर्नविलोकन समितीकडे संदर्भित केलेली किंवा करावयाची असतात त्यांना विशेष पुर्नविलोकन समितीचा निर्णय प्राप्त होईपर्यंत दक्षतारोध पार करण्यास अनुज्ञा देणे शक्य नसते. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही. १०७२/डी, दिनांक १२ एप्रिल १९७२ अन्वये अशा प्रकरणी दक्षतारोध पार करण्याच्या प्रश्नावर निर्णय घेणे विशेष पुर्नविलोकन समितीच्या शिफारशी प्राप्त होईपर्यंत स्थगित ठेवावे असे आदेश देण्यात आले आहेत. हे आदेश देण्याचा हेतू असा होता की, दक्षतारोध पार करण्याच्या प्रकरणातील निर्णय व विशेष पुर्नविलोकन समितीचा निर्णय ह्यामध्ये विसंगती निष्पन्न होण्याची शक्यता टाळावी.

३. राजपत्रित अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीपर्यंत सेवेत ठेवण्याबाबत पूर्वी त्यांची प्रकरणे एकूण दोन वेळा म्हणजे त्यांच्या वयाच्या ५० व ५५ व्या वर्षी पुर्नविलोकित करण्यात येत असत. शासनाच्या नवीन आदेशानुसार अशी प्रकरणे आता एकदाच म्हणजे त्यांच्या वयाच्या ५० व्या वर्षी पुर्नविलोकित करण्यात येतात. ह्या अधिकाऱ्यांना ५० वर्षापलीकडे सेवेत चालू ठेवण्यासाठी त्यांच्या कामाचा दर्जा "सर्वसाधारण" पेक्षा कमी दर्जाचा (Not below average) नसावा असा निकष ठरविण्यात आलेला आहे. ह्या सर्व बाबींचा विचार करून शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, दक्षतारोध पार करण्याची प्रकरणे सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अभिलेखाच्या आधारे काळजीपूर्वक तपासावी. जेथे सक्षम प्राधिकाऱ्याचे असे निश्चित मत बनेल की, गोपनीय अभिलेख संपूर्णत: निर्दोष असून संबंधित अधिकारी वयाच्या ५० व्या वर्षानंतर सेवेत रहाण्यास अपात्र ठरविण्याची शक्यता नाही, तेथे विशेष पुर्नविलोकन समितीच्या शिफारशीची वाट न पाहता दक्षतारोध पार करण्यास अनुज्ञा देण्यात यावी. मात्र ज्या प्रकरणात सक्षम प्राधिकाऱ्याला गोपनीय अभिलेख संपूर्णपणे निर्दोष आहे अशी खात्री नसेल व संबंधित अधिकारी वयाच्या ५० व्या वर्षानंतर सेवेत रहाण्यात अपात्र ठरण्याची थोडीही शंका असेल, तेथे दक्षतारोध पार करण्याच्या प्रश्नावर निर्णय, विशेष पुर्नविलोकन समितीची शिफारस प्राप्त होईपर्यंत प्रलंबित ठेवण्यात यावा. संबंधित अधिकाऱ्यांस मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याची शिफारस विशेष पुर्नविलोकन समितीने केल्यास अशा अधिकाऱ्यास कोणत्याही परिस्थितीत दक्षतारोध पार करण्याची अनुज्ञा देण्यात येऊ नये.

४. सर्व विभाग प्रमुख व मंत्रालयाचे सर्व विभाग ह्यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल अशी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. अं. कोटेश्वर,**
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति—
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
*प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र (१), मुंबई,
महालेखापाल, नागपूर (२), नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख.
*पत्राने.